**नि.फौ.ख.क्र. १११/२०१६**
सरकार – वि.- दिनेश कसबे
**निशाणी क्र. २२**

**<u>सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ -</u>**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – बाळासाहेब मारुती साबळे- तपास अधिकारी
वय – ६० वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त,
सध्या रा. - आळंदी, पुणे.

**<u>फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम २९९ प्रमाणे, सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती ए.एस.काळे यांचे मार्फत सुरु-</u>**

सन २०१६ मध्ये लोहमार्ग पोलीस स्टेशन येथे पोलीस हवालदार या पदावर कार्यरत होतो. गुन्हा क्र. १२९/२०१६ कलम ३७९ सह कलम ३४ भा.दं.वि चा तपास माझेकडे देण्यात आला होता. मी तपासा दरम्यान साक्षीदारांचे जबाब नोंदवले. गुन्हयातील फिर्यादी विजयकुमार हे दि. ०८/०५/२०१६ रोजी पिंपरी ते चिंचवड असे लोकल ट्रेनने जात होते. ते गाडीत चढत असताना कोणीतरी त्यांचे खिशातील मोबाईल व साडे तीन हजार रुपये चोरले. फिर्यादीने लगेचच आरोपीस पकडुन आमचे ताब्यात आणुन दिले होते. ठाणे अंमलदार वाघमारे यांनी अंगझडती पंचनामा केला होता व आरोपीच्या ताब्यातील मोबाईल व साडे तीन हजार रुपये जप्त केले होते. त्यांनी गुन्हयाचा तपास माझेकडे दिला होता. आरोपीविरुध्द सबळ पुरावा आढळल्याने मी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. तपासामध्ये असे निष्पन्न झाले की, आरोपीने प्रस्तुतचा गुन्हा केलेला आहे. आरोपीला आज रोजी पाहिल्यास ओळखु शकतो. तो आज गैरहजर आहे.

**सरतपास पुर्ण .**

**<u>आरोपी हा फरार असल्याने उलटतपास नाही.</u>**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2026.03.11 16:21:47 +0530

**(एन.जे.चव्हाण)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.
दि. ११/०३/२०२६